शालेय पोषण आहार योजनेसाठी
निधी वितरण (सन २०१९-२०)

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२०१९/प्र.क्र.१००/एस.डी.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १३ जून , २०१९

वाचा:-

१) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१/०४/२०१९

२) केंद्र शासनाचे आदेश क्र. F.No.३-४/२०१९-Desk (MDM) दि.२९/०४/२०१९

प्रस्तावना :-

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.२९/०४/२०१९ च्या आदेशान्वये रु.२३१७६.७५ लक्ष निधी राज्य शासनास वितरीत केलेला आहे. सदर निधीपैकी केंद्र शासनाने सर्वसाधारण (General Head) लेखाशिर्षाखाली रु. १७३४०.८४ लक्ष, अनुसूचित जाती उपयोजनेच्या (SCSP) लेखाशिर्षाखाली रु. ३०६१.६५ लक्ष आणि आदिवासी जमाती उपयोजनेच्या (TSP) लेखाशिर्षाखाली रु. २७७४.२६ लक्ष इतका निधी वितरीत केला आहे. केंद्र शासनाने वितरीत केलेल्या अनुसूचित जाती उपयोजनेच्या लेखाशिर्षाखालील (SCSP) केंद्र हिश्याचा रु. ३०६१.६५ लक्ष निधी व या योजनेसाठी केंद्र : राज्य हिश्याचे प्रमाण विचारात घेता, अनुसूचित जाती उपयोजनेच्या लेखाशिर्षाखालील (SCSP) रु. २०४१.१० लक्ष निधी राज्य हिस्सा म्हणून वितरीत होणे आवश्यक आहे. म्हणजेच अनुसूचित जाती उपयोजनेच्या लेखाशिर्षाखालील (SCSP) केंद्र व राज्य हिस्सा मिळून रु.५१०२.७५ लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शालेय पोषण आहार योजनेसाठी अनुसूचित जाती उपयोजनेच्या लेखाशिर्षाखालील (SCSP) केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा मिळून खालीलप्रमाणे रु.५१०२.७५ लक्ष (रुपये एकावण्ण कोटी दोन लक्ष पंचाहत्तर हजार) निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पित तरतूद	वितरीत करण्यात येत असलेला निधी
१.	मागणी क्रमांक ई - २ २२०२ - सर्वसाधारण शिक्षण, ०१ - प्राथमिक शिक्षण, ७८९ - अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत योजना, (०१) (०२)	रु. १२००० लक्ष	रु. ३०६१.६५ लक्ष

	शालेय पोषण आहार कार्यक्रम (MDM) (केंद्र पुरस्कृत योजना) (अनुसूचित जाती उपयोजना) (SCSP) (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२ I५१२)		
२.	मागणी क्रमांक ई - २ २२०२ - सर्वसाधारण शिक्षण, ०१ - प्राथमिक शिक्षण, ७८९ - अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूशित जाती उपयोजनांतर्गत योजना, (०१) (०३) शालेय पोषण आहार कार्यक्रम (MDM) (केंद्र पुरस्कृत योजना) (अनुसूचित जाती उपयोजना) (SCSP) (राज्य हिस्सा ४०%) (२२०२ I५२१)	रु. ८००० लक्ष	रु.२०४१.१० लक्ष
एकूण		**रु. २०००० लक्ष**	**रु. ५१०२.७५ लक्ष**

२. सदरचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७५/एसआयएसए, दि. २७/५/२०१९ नुसार आणि वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०१/०४/२०१९ च्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ५ ते १७ मधील अटींची तसेच, परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १३ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. १२ नुसार केंद्र शासनाचा निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र. १९८/आर्थोपाय, दिनांक ०४/०५/२०१९ अन्वये दिलेले आहेत. सदर निधीचा विनियोग वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०१/०४/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७१४५९६१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=4a3b99d57d257e955ed34ca51db1f3c521002555e05c455e86fa1c9c82a1d82b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=68d5a8abffdd75cba24301aa39c12b40983f304d7267796a32b42d4d558f1a1f, ou=SCHOOL EDUCATION , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2019.06.13 17:01:41 +05'30'

(प्रमोद पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई

४) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई

६) सर्व मा. संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य

७) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

८) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

९) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१०) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

११) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

१२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½ , मुंबई/नागपूर

१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१५) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)

१६) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई

१७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई

१८) निवड नस्ती - एस.डी. ३